# साहित्य आणि चित्रपट

प्रसाद रवींद्र ठाकूर
प्रसाद व्हीला, इंद्रप्रस्थ नगर, टाकळकर कॉलनी, साने गुरुजी वसाहत, कोल्हापूर.

एकोणिसावे शतक हे अनेक अर्थांने महत्त्वपूर्ण म्हणावे लागेल, याच शतकात अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक बदल घडून आले. याच काळात तंत्रज्ञान आणि विज्ञान या क्षेत्रातल्या संशोधनामूळे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात चित्रपटकलेने जन्म घेतला आणि अल्पावधीतच ती विसाव्या शतकातील एक महत्त्वपूर्ण कला बनली. भारतीय चित्रपट हे भारतीय इतिहास आणि वैविध्यपूर्ण भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारे प्रभावशाली माध्यम आहे. आपल्या देशातील अधिकाधिक लोक भाषा, प्रांत, वंश हे सर्व प्रकारचे भेद विसरून या माध्यमाशी जोडले गेले आहेत. सृजनशीलतेचा पुरेपूर वाव असणाऱ्या या क्षेत्रात अनेक दिग्दर्शकांनी अनेक वैविध्यपूर्ण विषय हाताळलेले दिसून येतात. भारतीय चित्रपटसृष्टी जगातील सर्वात मोठी आणि आर्थिकदृष्ट्या समृद्ध चित्रपटसृष्टी मानली जाते. जागतिक स्तरावर भारतीय चित्रपटांनी स्वत:चे वेगळेपण जपले आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे भारतात दर वर्षाला १००० ते १५०० चित्रपट निर्माण केले जातात. प्रादेशिक चित्रपटांचा विचार करता फक्त मराठीत जिथे एके काळी वर्षाला १५ ते २० चित्रपट निर्माण होत होते तिथे आज वर्षाला किमान १०० चित्रपट निर्माण होत आहेत. हीच परिस्थिती इतर प्रादेशिक चित्रपटांच्या बाबतीतही आहे. या चित्रपटांचा आस्वाद घेणाऱ्यांची संख्याही कित्येक कोटींच्या घरात आहे आणि यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार केला तर तोही आज अरबोंच्या घरात पोहोचला आहे.आज अनेक भाषांमधून निर्माण होणारे भारतीय चित्रपट केवळ भारतातच नव्हे तर जगात सर्वत्र पहिले जातात. जपान, जर्मनी, रशिया आणि युरोपातील अनेक देशात भारतीय चित्रपट चांगला व्यवसाय करताना दिसून येत आहेत. वर उल्लेख केल्याप्रमाणे चित्रपट हा व्यवसाय तर आहेच परंतु त्याचबरोबर तिचे कला म्हणून असलेले स्थान नाकारता येणार नाही अर्थात तथाकथित कलेच्या व्याख्यांचे बंध चित्रपट कला नाकारत असली तरी कलेचे मुळ रूपबंध तिच्यामध्ये आहेतच किंबहुना अनेक कलांना सामावून घेणारी बहुआयामी कला आहे असे म्हणणे जास्त रास्त ठरेल. कला ही जाणीवपूर्वक घडवली जाणारी मानवनिर्मित अशी सौंदर्यनिर्मिती आहे. म्हणूनच कलांना ललितकला असेही म्हटले जाते. ललितकला आणि उपयुक्त कला असा भेद केला जातो असे दिसून येते. संगीत, नृत्य, वास्तू, चित्र, शिल्प आणि साहित्य या प्रमुख सहा ललित कला मानल्या जातात. कारण त्या मानवी पंचेद्रियांना कल्पनेच्या पातळीवर आवाहत करतात. यातील साहित्यकलेवर आपण अधिक चर्चा करणार आहोत. परंतु त्याचबरोबर कलेच्या सर्व शाखांना सामावून घेणाऱ्या चित्रपटकलेवरही प्रकाश टाकणार आहोत. चित्रपटाकडे केवळ कलात्मक दृष्टीने पाहिले जातेच असे नाही. ते एक

मनोरंजनाचे साधन आहे, असा बऱ्याच जणांचा समज आहे. केवळ साहित्याच्याच नव्हे, तर कलेच्या सर्व शाखांना सामावून घेणारे चित्रपट हे एकमेव माध्यम आहे. कथा, कादंबरी, कविता, नाट्य, संगीत, चित्र व नृत्य या सर्व कलाशाखांना चित्रपटामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. १९ व्या शतकामध्ये साहित्य ही जशी सर्वात महत्त्वाची अभिव्यक्ती मनाली जात होती तशीच सध्या चित्रपट ही महत्त्वाची अभिव्यक्ती मानली जाते. साहित्यकृती आणि चित्रपट या दोन्ही कलांमध्ये परस्परसंबंध आणि भेदही आहेत. या दोन्ही कलाविष्कारांच्या तौलनिक अभ्यासानंतर एका कलेने दुसऱ्या कलेला जे असामान्य योगदान दिलेले आहे, त्याचे विश्लेषण करणे शक्य आहे. साहित्य ही शब्दाश्रयी कला समजली जाते; त्याचप्रमाणे चित्रपट ही दृक्¬श्राव्य अशी यंत्राधिष्ठित कला मानली जाते.

कलेची व्याख्या करताना वसंत डहाके स्पष्ट करतात, प्रत्येक कलाकृती ही स्वायत्त असते आणि तिचे स्वतःचे असे स्वतंत्र वैशिष्ट्य असते. नेमके हेच वैशिष्ट्य साहित्य आणि चित्रपट या दोन्ही कलांबाबतही दिसून येते. परंतु असे असले तरी प्रत्येक कलाकृतीत तीन घटक समान असतात. ते म्हणजे माध्यम (मिडियम), रूपबंध किंवा आकृतिबंध (फॉर्म) आणि आशय (कंटेण्ट). प्रत्येक कलेचे माध्यम वेगळे असते. त्यामुळे प्रत्येक कलेचा रूपबंध वेगळा असतो. मात्र कोणतीही कलाकृती कोणत्यातरी माध्यमातच अभिव्यक्त होते. तिला काही आकार (रूपबंध) असतो आणि त्या माध्यमातून काही आशय व्यक्त होत असतो. कलाकृतींच्या संदर्भात हे तीन घटक अगदी अपरिहार्य असे आहेत. थोडक्यात आपल्या विचारांची आणि भावनाची अभिव्यक्ती करण्यासाठी मनुष्याने अर्थपूर्ण असे मार्ग शोधले. आपल्या कल्पना व्यक्त करण्यासाठी प्रतिके निर्माण केली आणि आपल्या कल्पनेच्या जगाला रूप देण्यासाठी आकार निर्माण केले आणि त्याच्या याच प्रयत्नातून निरनिराळ्या कलांचा उदय झाला. वर उल्लेख केल्याप्रमाणे कलेच्या घटकांमधील माध्यम या संकल्पनेचीही या ठिकाणी चिकित्सा होणे गरजेचे आहे

माध्यम म्हणजे एखादी गोष्ट संप्रेषित करण्यासाठी वापरलेला तंत्रसमुच्चय असे म्हणता येईल. कलाविष्कार करण्यासाठी कलावंताने वापरलेला विशिष्ट प्रकारचा आशय आणि तो व्यक्त करण्यासाठी त्याने वापरलेल्या तंत्रसम्मुच्चयांना आपण माध्यम म्हणू शकतो. आजकाल माध्यम हा शब्द प्रामुख्याने वृत्तपत्रे, दूरदर्शन, चित्रपट, रेडियो आदी माध्यमांसाठी वापरला जातो. जनमाध्यमांचा अभ्यास करत असताना लिखित भाषेचा समाजजीवनावर झालेला दूरगामी परिणाम लक्षात घ्यावा लागतो. वस्तुतः व्यापक अर्थाने विचार केला तर साहित्यकला ही सुद्धा माध्यमाच आहे. कारण साहित्य कलेतही आविष्कारतंत्रे वापरली जातात. एकंदरीत सर्व कला या माध्यमेच आहेत. त्यानुसार कादंबरी आणि चित्रपट ही सुद्धा कलामाध्यमेच आहेत आणि या दोन्ही कलामाध्यमांची स्वतंत्र आविष्कारतंत्रे आहेत. ती आविष्कारतंत्रे लेखक आणि दिग्दर्शक आपापली कलानिर्मिती करतांना वापरत असतात. या खेरीज या दोन्ही कलामाध्यमांना अभिव्यक्त होण्यासाठी

स्वत:ची म्हणून माध्यमे आहेतच. आणि ती म्हणजे कादंबरीचे शब्द आणि चित्रपटाचे दृक-श्राव्य चित्रचौकट अर्थात फ्रेम. या दोन माध्यमातून ही कलामाध्यमे अभिव्यक्त होतात. वस्तुतः साहित्य आणि चित्रपट ही दोन्हीही जनसंवादाची माध्यमे असून यांचे जनमाध्यमे म्हणून असलेले स्वतंत्र असे महत्त्व आजही अबाधित आहे. थोडक्यात प्रत्येक कलेचे एक विशिष्ट असे आविष्कारमाध्यम आहे. ज्याप्रमाणे रंग आणि रेषा हे चित्रकलेचे माध्यम मानले जाते, शिळा किंवा मृत्तिका हे शिल्पकलेचे माध्यम मानले जाते, सूर हे संगीतकलेचे तर लय हे नृत्यकलेचे माध्यम मानले जाते, त्याचप्रमाणे भाषा किंवा शब्द हे साहित्यकलेचे माध्यम मानले जाते. चित्रपट या कलेत मात्र सर्व कलाप्रकार आणि त्यांची माध्यमे उपयोजिली जातात. त्यामुळे चित्रपट कला ही अधिक आवाहक ठरते. अभिनेता हा नाट्यकलेचे माध्यम असतो. परंतु चित्रपटची तांत्रिक बाब लक्षात घेता दृक्-श्राव्य चित्रचौकट (फ्रेम) हेच चित्रपटाचे माध्यम म्हणणे अधिक योग्य ठरेल.

कादंबरी हा वाचकप्रिय साहित्यप्रकार आहे त्याचप्रमाणे चित्रपट हाही लोकप्रिय दृक्श्राव्य कलाप्रकार आहे. साहित्यकलेच्या तुलनेत चित्रपटकलेचे आगमन उशिरा झाले आहे. परंतु कथात्मकता आणि वास्तवसदृश्यता हे घटक दोन्ही कलाकृतीतील साम्य दर्शवितात. साहित्यकृती आणि चित्रपट या दोन्ही कलांमध्ये परस्परसंबंध आणि भेद असूनही सैद्धांतिक पातळ्यांवरील त्यांच्या संबंधांची चर्चा होणे गरजेचे आहे. साहित्यकृती आणि चित्रपट या दोन्ही कला वेगवेगळ्या आहेत. परंतु असे असले तरी त्यांच्यात काही समान सूत्रे आहेत आणि तीच सूत्रे दोन्ही कलांना एकत्र आणतात. उदाहरणार्थ कथात्मकता, जीवनदर्शनाची जाणीव, मानवी मनाचा शोध, अशी काही समान सूत्रे सांगता येतील. कादंबरी ही लेखकाची निर्मिती मानली जाते तर चित्रपट ही दिग्दर्शकाची निर्मिती मानली जाते. कादंबरी वाचकासाठी असते तर चित्रपट प्रेक्षकांसाठी असतो. कादंबरी एका वेळी एकाच वाचकाकडून वाचली जाते तर चित्रपट एका वेळी अनेक प्रेक्षकांकडून पाहिला जातो. म्हणजे दोन्ही कलाकृतींची आस्वादप्रक्रियाच मूलतः निरनिराळी आहे. तरीही त्यांच्यात काही बाबतीत बरेच साम्यही आहे. दोन्ही प्रकार प्रामुख्याने कथनात्मक आहेत, दोन्ही ठिकाणी व्यक्तिरेखन, कलाकृतीनिर्मात्याचा दृष्टिकोन, समाजचित्रण हे घटक महत्त्वाचे आहेत. म्हणूनच कादंबरीला पॉकेट थिएटर म्हटले गेले आहे असेही दिसते. येथे आणखी एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे असे वाटते ती म्हणजे चित्रपटाकडे केवळ कलात्मकदृष्टीने पाहिले जातेच असे नाही. ते एक मनोरंजनाचे साधन आहे, असा बऱ्याच जणांचा समज आहे. केवळ वाङ्मयाच्याच नव्हे, तर कलेच्या सर्व शाखांना सामावून घेणारे चित्रपट हे एकमेव माध्यम आहे. कथा, कादंबरी, कविता, नाट्य, संगीत, चित्र व नृत्य या सर्व कलाशाखांना चित्रपटामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. दिग्दर्शक हा चित्रपटसंहितेचे तंत्राच्या माध्यमातून दृक्¬श्राव्य रूपात रूपांतर करणारा महत्त्वाचा घटक असतो. नेपथ्य, संगीत, रंगभूषा, प्रकाशयोजना, ध्वनिपरिमाण, संवाद, पात्रे आणि कथानक या सगळ्यांचा एकत्रित व सम्यक्¬विचार करून या विविध घटकांचे सुसूत्र नियोजन करण्याचे काम दिग्दर्शक करतो. त्यामुळे दिग्दर्शकाच्या कल्पकतेप्रमाणे चित्रपट तयार होतो. चित्रपट

तयार करणे म्हणजे कॅमेऱ्याच्या मदतीने तयार केलेल्या चलत्¬चित्रांच्या माध्यमातून सादर केलली कथामालिका होय. किंवा असेही म्हणता येईल की, मानवी अनुभव, कथा, कल्पना, भावना, विचार, सौंदर्य आदी अनेक घटकांचा चलत्¬चित्रांच्या माध्यमातून केलेला वास्तवसमांतर आणि आवाहक आविष्कार म्हणजे चित्रपट होय. चित्रपट म्हणजे स्थिर चित्रांची अशी चित्रमालिका म्हणता येईल की जी दृष्टीभ्रमाच्या मदतीने रुपेरी पडद्यावर प्रत्यक्ष प्रतिमांचा भास निर्माण करते. दृष्टिसातत्याच्या सिद्धांतानुसार रुपेरी पडद्यावर प्रत्यक्ष प्रतिमांचा आभास निर्माण करणारी स्थिर चित्रमालिका म्हणजे चित्रपट होय. इतर सर्व ललितकलांच्या आस्वादासाठी अभ्यासाची गरज असते. परंतु डोळे, कान आणि डोके शाबूत असणाऱ्या कुणाही माणसाला चित्रपट सहजगम्य वाटतो. प्रत्येक कलेच्या आस्वादासाठी त्या कलेची परिभाषा माहीत असणे गरजेचे आहे परंतु चित्रपटाचे तंत्रज्ञान किंवा परिभाषा माहीत नसली तरी आस्वादात बाधा येत नाही. उदाहरणार्थ, साहित्यकृतीचा आस्वाद घ्यायचा तर प्रथम साहित्यकृती ज्या भाषेत आहे ती भाषा शिकावी लागेल. अर्थातच त्या साठी व्यक्ती साक्षर असणे गरजेचे आहे. परंतु चित्रपट पाहण्यासाठी अशा पद्धतीच्या कोणत्याही शिक्षणाची आवश्यकता नसते. त्यामुळेच चित्रपटकला ही आजच्या काळातील एक महत्त्वाची कला आणि अभिव्यक्ती मनाली जाते.

संदर्भ सूची

१. गोगटे सुचित्रा, तगवाले सिद्धेश्वर आणि इतर : मनव्याविद्या व ललितकलांचा परिचय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, प्रथम प्रकाशन आक्टोबर २०००.

२. गोळवलकर रमा : जनसंवाद सिद्धांत आणि व्यवहार,

३ . चितळे, माधव : भारतीय चित्रपट, विहारा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली मार्च १९९३.

४ . ठाकूर रवींद्र : कादंबरीकार र. वा. दिघे, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती दुसरी २०१२

५ . डहाके, वसंत आबाजी : दृश्यकला आणि साहित्य, लोकवाङ्मय गृह मुंबई, आवृत्ती पहिली २०१३.

६ . वाटवे, बापू : दादासाहेब फाळके भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, आवृत्ती दुसरी २०००.

७ . उत्तम अनुवाद (दिवाळी अंक २०१३) पद्मगंधा प्रकाशन पुणे, संपा. अरुण जाखड

८. ठाकूर, प्रसाद (२०१६). माध्यमांतर: कादंबरी आणि चित्रपट, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.

९. थोरात, राजेंद्र आणि कसबेकर आ. (२०१७ ). साहित्यकृतीचे माध्यमांतर, संस्कृती प्रकाशन पुणे .

१०. महाजन, प्रवीण (२०१७) मराठी साहित्य आणि चित्र 'पटकथा'., माय बुक नागपूर.

११. शेख, अ. (२०१७). माध्यमांतर मीमांसा, लुलू प्रकाशन, सोलापूर

१२. सपकाळ, अनिल (२००५) मराठी चित्रपटाची पटकथा, प्रतिमा प्रकाशन.

१३. रूपवाणी (२०११) संपा. सुधीर नांदगावकर, प्रभात चित्र मंडळ, मुंबई.

१४. अनभै (२०१३) संपा. रतनकुमार पाण्डेय.